# केस डायरी

## गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय नाशिक

# केस डायरी लिहीण्यासंबधीची कायदेशीर तरतुद

फौजदारी प्रक्रिया संहिता – १९७३ मधील प्रकरण १२ मधील कलम – १७२ मध्ये गुन्हे अन्वेषण कार्यवाहीतील दैनंदिन कामकाजाचा रोजनामा लिहणे बद्दल तरतुद केलेली आहे. तसेच महाराष्ट्र पोलीस नियमावली – १९९९ नियम – २३५ (८) मध्ये केसडायरी बाबत तरतुद केलेली आहे.

# फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७२ मधील पोट कलम १ ते ३ मधील तरतुदी

- कलम १७२ (१) :- या प्रकरणाखाली अन्वेषण करणारा अधिकारी रोजनामा / केसडायरी लिहीतांना, कोणत्या वेळी त्याला खबर मिळाली, तपासास सुरवात केली ती वेळ, तपास संपविला ती वेळ, कोणते स्थळाला भेट दिली, कोणत्या गोष्टींची खातरजमा झाली याबाबतचे रोजचे रोज नोंद घेण्यात यावी. (फौ.प्र.सं. सुधारणा अधिनियम २००८, कलम १७२ १अ / १ब ) साक्षीदारांचे जाबजबाब (तपास टिपण) यांचा केसडायरी मध्ये संपुर्ण पणे समावेश, प्रत्येक पानावर पृष्ठ क्रमांक देण्यात यावा व ती अनुक्रमणिका सह पुस्तक स्वरूपात असावी. (महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र./२०११/प्र.स १७९/पोल-११, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक ११.०२. २०११)

# फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७२ मधील पोट कलम १ ते ३ मधील तरतुदी

- **कलम १७२ (२)** :- फौजदारी न्यायालयाला केसडायरी मागवता येईल. तीचा वापर पुरावा म्हणुन नाही तर मदत म्हणुन करता येईल.
- **कलम १७२ (३)** :- केसडायरी अरोपी किंवा त्याचे प्रतिनिधी मागवु किंवा पाहु शकत नाहीत. परंतु तपासी अधिकारी यांने न्यायालयासमोर त्यांचे स्मृतीचा उजाळा करणेसाठी केसडायरीचे वाचन केले तर ते भारतीय पुरावा कायदा कलम – १६१ किंवा प्रकरण परत्वे भा.पु.क कलम १४५ चे उपबंध लागु होतील ( भा.पु.का – १६१ स्मृतीला उजाळा देणेसाठी वापरलेले लिखाण बाबत विरूध्द पक्षाचा तो उलट तपासणीसाठी वापरू शकतात तसेच भा.पु.क. कलम १४५ अन्वये पुर्वीचे लेखी कथनासंबधी उलट तपासणी घेणे असलेस केसडायारीचा वापर करता येतो)

# केस डायरी लिहीण्याचा उद्देश

- ➢ गुन्हे तपासाच्या कामात तपासी अंमलदाराची नियमीतता राखणेसाठी
- ➢ वरीष्ठ अधिका-यांना गुन्हे तपासाची प्रगती समजणेसाठी
- ➢ गुन्हयाचा तपास दुस-या तपासी अधिकार-याकडे / अंमलदाराकडे वर्ग झालेनंतर तपासाची प्रक्रीया सातत्याने चालु राहणेकरीता
- ➢ तपासादरम्यान आरोपीताची पोलीस कोठडी घेणे करीता
- ➢ गुन्हे तपासामधील खोटेपणा टाळण्यासाठी
- ➢ तपास कामामध्ये लागणारा उशीर किंवा अडचणी बाबत खुलासा देणेसाठी तपासी अंमलदाराला मदत मिळणेसाठी

# केस डायरी केव्हा लिहीली पाहीजे

- दखलपात्र अपरधांचे अन्वेषण करतांना
- फौजदारी प्रक्रीया संहिता कलम १७४ अन्वये अकस्मात मृत्युचे अन्वेषण करतांना
- न्यायालयात दाखल केलेल्या तक्रारी संबधी न्यायालयाकडुन फौ.प्र. सं. कलम १५६(३) अन्वये एम गुन्हा तपासासंबधीचा आदेश प्रात्प झालेनंतरचे अन्वेषण करतांना
- न्यायालयात दाखल केलेल्या तक्रारी संबधी न्यायालयाकडुन फौ.प्र. सं. कलम २०२ अन्वये तपासासंबधीचा आदेश प्रात्प झालेनंतरचे अन्वेषण करतांना
- कोणत्याही नॉनकॉग्नीझेबल खटल्यात सी.आर.पी.सी.कलम १५५(२) अन्वये तपास करण्याचा न्यायालयाने पोलीस अंमलदारास आदेश केल्यानंतरचे अन्वेषण करतांना

# केसडायरी/ प्रकरण दैनंदिनी / रोजनामा  नमुना

## दखलपात्र अपराधाच्या केसडायरीचा नमुना :-

| अ.नं | पो.स्टे.जा.क्र.       /२०२१<br>दिनांक   /      /२०२१ | | |
|---|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे | ९. | गेला माल |
| २ | प्रथम खबर क्रमांक | १० | मिळाला माल |
| ३ | तपासी अधिकारीचे नांव | ११. | अधिकारी भेट दिली ठिकाण |
| ४ | फिर्यादीचे नांव, वय व पत्ता | १२ | तपास सुरु केला ता. वेळ |
| ५ | आरोपीचे नांव, वय  व पत्ता | १३. | तपास संपला  ता. वेळ |
| ६ | अपराध घडला ठिकाण | १४ | प्रकरण दैनंदिनी क्रमांक |
| ७ | अपराध घडला तारीख व वेळ | १५ | थोडक्यात हकीगत |
| ८. | अपराध दाखल तारीख वेळ | १६ | तपासाचा गोषवारा  / खुलासा |

टिप :- आरोपीचे वय आरोपीतास अटक केल्यानंतर टाकावे, त्याचबरोबर त्याची अटक ता. वेळ नमुद करून तो सध्या पोलीस कोठडीत / न्यायालयीन कोठडीत किंवा जामीनावर आहे काय याबाबतचा तपशिल नमुद करावा

# केसडायरी/ प्रकरण दैनंदिनी / रोजनामा  नमुना

## अकस्मात मृत्युच्या केसडायरीचा नमुना :-

| अ. नं | पो.स्टे.जा.क्र. /२०२१<br>दिनांक / /२०२१ | | |
|---|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे | ९. | पोस्ट मार्टम झाले काय |
| २ | अकस्मात मृत्यु रजी नं | १० | अधिकारी भेट दिली ठिकाण |
| ३ | तपासी अधिकारीचे नांव | ११. | तपास सुरू केला ता. वेळ |
| ४ | खबर देणा-याचा नांव व पत्ता | १२ | तपास संपला  ता. वेळ |
| ५ | मयताचा नांव, वय  व पत्ता | १३. | प्रकरण दैनंदिनी क्रमांक |
| ६ | अकस्मात मृत्यु घडला ठिकाण | १४ | थोडक्यात हकीगत |
| ७ | अकस्मात मृत्यु दाखल तारीख व वेळ | १५ | तपासाचा गोषवारा / खुलासा |
| ८. | इंन्कवेस्ट पंचनामा केला काय | | |

# केस डायरी लिहीण्याची पध्दत व गरज

- पेलीस ठाणे दैनंदिनी मध्ये नोंद घेवुन केसडायरी लिहतांना तपास सुरू केले बाबत नोंद घेवुन केसडायरी लिहीणेस सुरवात करावी
- ज्या दिवशी अपराधाचा / अकस्मात मृत्युचा तपास केलेला नाही. त्या दिवशी केसडायरी लिहू नये. परंतु त्याचे पुढचे केसडायरीमध्ये केसडायरी लिहीतांना तपासासंबधी पडलेल्या गॅप बाबत थोडक्यात स्पष्टीकरण लिहुन सुरवात करावी.
- केसडायरी दोन प्रतित लिहावी व तीची दुय्यम प्रत उपविभागीय पोलीस अधिकारी / संबधीत वरीष्ठ पोलीस अधिकारी यांना दररोज पाठवावी. सेशन कमीट अपराधांचे बाबत अपर पोलीस अधिक्षक यांना सदरची प्रत न चुकता पाठवावी.
- केसडायरी मध्ये साक्षीदारांचे जबाब, गोपनीय साक्षीदारांची माहिती, नकाशा, जप्ती पंचनामा, पुर्ण जप्तीमधील आर्टीकल त्यांचे निरीक्षण, कस्टडी बाबत नोंदी ई केसडायरी मध्ये समावेश करून शेवटी आजाचे दिवसाचा निष्कर्ष / पुढील तपासाचे नियोजन सारांशरूपी लिहावा.
- केसडायरी मध्ये ( MEMO OF EVIDENCE ) एका शेवटचे रकानामध्ये लिहावा म्हणजे तपासाचे प्रगतीबाबत आकलन होते.

# केस डायरी लिहीण्याची पध्दत / गरज

- मा. न्यायालय समोर आरोपी याची पोलीस कस्टडी रिमांडचे मागणी करीता केसडायरीची आवश्यकता असते. मा. न्यायालय रिमांड कस्टडी देतांना केसडायरीचे अवलोकन करून रिमांड देते.
- प्रथम खबर दाखल झाले पासुन, गुन्हा तपासाचे ठाणे प्रभारी किंवा ठाणे अंमलदार यांचे स्वतंत्र पणे आदेश घेवुन तपासास सुरवात केली पाहीजे व तसा केसडायरी मध्ये उलेख केलेला पाहिजे. घटनास्थळ भेट, निरीक्षण, पंचनामा, जप्ती इत्यादी बाबत सविस्तर नोंदी यांचा समावेश केला पाहिजे.
- आरोपीचे अटक बाबत कारणे, अटक न करणेबाबतची कारणे, मा. न्यायालयात पाठविलेले अहवाल, सरकारी अभियोक्ता यांना सादर केलेल अहवाल बाबत सविस्तर नोंदी, मा. न्यायालयासमोर घडलेले युक्तवाद यांचे सारांश, ओळख परेड, तांत्रीक पुरावा, सिडीआर, एसडीआर, डंपडाटा, न्यायसहाय्यक प्रयोगशाळा, वैद्यकीय अधिकारी, आरटीओ, इतर विभाग, तज्ञ यांचेशी केलाला पत्रव्यवहार, त्यांचे कडुन प्राप्त झालेले अहवाल, गुन्हे तपासासंबधी केलेला सर्व प्रकारचा पत्रव्यवहार, तपासयादी या सर्वांचा उल्लेख व त्यातुन निष्पन्न झालेले निष्कर्ष यांचा उल्लेख केसडायरीत न चुकता कारावा.

# केस डायरी लिहीण्याची पध्दत / गरज

- केसडायरी बाबत मा. न्यायालयाने पाहिले असलेस तसा ( Seen ) म्हणुन मा. न्यायालयाचा शेरा घ्यावा.
- केसडायरी ही अत्यंत गोपणीय स्वरूपाचे दस्ताऐवज आहे व ते सहज कोणाचे हातात पडेल असे ठेवू नये, त्याची कस्टडी स्वत:चे ताब्यात असु द्यावी, मदतनीस वर विसंबुन राहु नये.
- केसडायरी मध्ये आरोपी जबाब, पुरावा अहवाल, वैद्यकीय अहवाल, आरोपीचे पाश्वभुमीवर मोबाईल मधुन काढलेले फोटोग्राप्स, गुन्हेचे घडले हकीगत बाबत सारांशरूपी पार्श्वभुमी, व्हिडीओ रेकॉर्डींग आरोपीचा जबाब, फौ.प्र.सं. कलम – १६१ नुसार नोंदविलेले पुर्ण जबाब जसेचे तसे वरीष्ठ अधिकारी / सरकारी अभियोक्ता, इतर मदतनिस यांनी केलेली मदत इत्यादींची नोंद थोडक्यात घ्यावी.
- मा. न्यायालयासमोर आरोपीची कस्टडी रिमांड घेणे असलेस आरोपीचे थोडक्यात कथन हे केसडायरीमध्ये नोंदवुन घ्यावे.

# केस डायरी च्या  अनुक्रमणिकेचा नमुना

| पोलीस ठाणे :- | | गु.र.नं व कलम       /२०२१ | | |
|---|---|---|---|---|
| -: अनुक्रमणिका :- | | | | |
| केसडायरी क्रमांक | दिंनाक | केलेल्या कामकाजाचे स्वरूप थोडक्यात | एकुण पृष्ठ संख्या | केसडायरी पृष्ठ क्रमांक |
| १ | /    /२०२१ | तपास आदेश स्वीकारले, प्रथम खबरीचे अवलोकन केले. | ०४ | ०१ ते ०४ |
| २ | /    /२०२१ | घटनास्थळ पंचनामा | ०२ | ०५ ते ०६ |
| ३ | /    /२०२१ | साक्षीदारांचे जबाब | १० | ०७ ते १६ |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| | /    /२०२१ | दोषारोप सादर केले | ०२ | ३५ ते ४० |

# प्रश्न व सुचना



# धन्यवाद ....

# धन्यवाद